सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/१५० दिनांक : ०३/०८/२०२६

प्रति,
**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत.**
**संदर्भ क्र.: F.No. 1-15/2009(ARC)PT.III Dated July 27,2026**

महोदय/महोदया,

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंगच्या प्रकारांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने **महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम, १९९९** लागू केला आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाने 'UGC Regulation on curbing the menace of Ragging in Higher Education Institutions, २००९' अधिनियमामध्येसुद्धा यासंदर्भात काही ठळक तरतूदी केल्या आहेत. त्यानुसार भविष्यात रॅगिंगच्या घटना घडू नयेत याकरिता व्यापक स्वरूपात व जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था, पदवी व पदव्युत्तर विभागातील प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर अधिनियमांची माहिती करून देऊन विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगचे प्रकार प्रतिबंधित करण्याच्या दृष्टीने विस्तृत स्वरूपात जागृती करावी. तथापि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिनियमांचे तंतोतत व काटेकोर पालन करणे महाविद्यालय/परिसंस्था/पदवी व पदव्युत्तर विभाग यावर बंधनकारक आहे.

१) रॅगिंगविरोधी मोहिम आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमधून अधिक नेमस्तपणे सुरू करावी. महाविद्यालयाचे माहितीपत्रक व प्रवेशासंबंधीच्या तत्सम प्रकाशनांद्वारे रॅगिंगविषयीच्या शिक्षेबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत. रॅगिंगमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांस त्याची बाजू मांडण्याची संधी द्यावी, त्याचे म्हणणे असमाधानकारक वाटल्यास त्यास महाविद्यालयातून निलंबित करावे आणि अशाप्रकारे शिक्षा झालेल्या विद्यार्थ्यांची नावे महाविद्यालयाच्या माहितीपत्रकात नमूद करावीत असे अपेक्षित आहे.

शैक्षणिक संस्थेकडून प्रवेशासाठी छापलेल्या पुस्तिकेमध्ये (prospectus) प्रवेशासाठी येणारा विद्यार्थी यापूर्वी रॅगिंगमध्ये गुंतलेला असेल तर त्याला प्रवेश नाकारण्यात येईल, असे स्पष्टपणे नमूद करावे किंवा प्रवेश दिल्यानंतरही सदर विद्यार्थी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला होता असे निदर्शनास आले तर त्याला निष्कासित करण्यात यावे.

२) आपल्या महाविद्यालय व परिसंस्थेत रॅगिंग प्रतिबंध समित्या आणि पथके तातडीने स्थापन व कार्यान्वित करावीत. महाविद्यालयात रॅगिंगविरोधी समिती आणि पथक नियुक्त करून त्या सर्व सदस्यांची नावे, पत्ते व दूरध्वनी क्रमांक प्रसिद्ध करावेत.

आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेत 'रॅगिंग प्रतिबंध समिती' व 'रॅगिंग प्रतिबंध पथक' नियुक्त करताना समितीमध्ये स्थानिक नागरिक, पोलिस प्रशासन, प्रसारमाध्यमे, अशासकीय स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींबरोबरच महाविद्यालयीन शिक्षक, पालक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थ्यांनाही प्रतिनिधीत्व असावे. या समितीचे प्रमुख प्राचार्य/संचालक असावेत. रॅगिंग प्रतिबंध पथक हे पर्यवेक्षणाच्या कामात सतर्क असेल व यामध्ये बाहेरील व्यक्तींचा समावेश असणार नाही.

३) नविन आलेल्या व या अगोदरच्या सर्व विद्यार्थ्यांचे समुपदेशन वर्ग व उद्‌बोधन अभ्यासक्रमाद्वारे प्रबोधन करावे. सर्व महाविद्यालये/शिक्षण संस्थानी प्रवेशावेळी तज्ज्ञ/व्यावसायिक समुपदेशकामार्फत नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करावे.

४) रॅगिंगमध्ये दोषी आढळलेल्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे तरतूद असलेली शिक्षा करून झालेल्या शिक्षेबाबत व्यापक प्रसिद्धी द्यावी.

उदा :— अ) स्कॉलरशिप व तत्सम आर्थिक लाभ देण्याचे थांबवणे.
ब) महाविद्यालयातून निलंबित करणे
क) निकाल थांबविणे.
ड) वसतिगृहातून निलंबित करणे.

५) महाविद्यालय सुरू होताना दृकश्राव्य माध्यमाच्या मदतीने रॅगिंग प्रतिबंधाबाबत विद्यार्थ्यांचे प्रबोधन करणे.

६) विद्यार्थी संघटनांमध्ये रॅगिंगच्या वाईट परिणामांची व तत्संबंधी होणाऱ्या शिक्षेबाबतची जाणीवजागृती करावी.

७) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार रॅगिंगमध्ये सहभागी होणार नाही अशा आशयाचे विद्यापीठ अनुदान आयोगाने उपलब्ध करून दिलेल्या https://www.antiragging.in/compliance_desclaimer.php या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रतिज्ञापत्र भरून घेणे. अनिवार्य आहे.

८) महाविद्यालयात व मान्यताप्राप्त परिसंस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींकडून रॅगिंग संदर्भातील हमीपत्र घेताना मा. सर्वोच्च न्यायालय, विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाकडून देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन करावे.

९) वसतिगृहातील प्रवेश अत्यंत काळजीपूर्वक द्यावेत. वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वतंत्र समुपदेशन आयोजित करण्यासाठी वसतिगृहप्रमुखांनी पुढाकार घ्यावा.

१०) ज्या महाविद्यालयात / मान्यताप्राप्त परिसंस्थेत रॅगिंगच्या घटना वारंवार घडल्याच्या नोंदी होतील व जी महाविद्यालये याबाबत उपाययोजना करणार नाहीत त्यांचे विद्यापीठ अनुदान आयोग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अन्य संस्थाकडून मिळणारे अनुदान थांबविण्यात येईल.

संबंधित संस्थेचे/महाविद्यालयाचे प्रशिक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व प्राधिकारी यांची रॅगिंगला प्रतिबंध करण्याची सामुदायिक जबाबदारी राहील. शैक्षणिक संस्थेने रॅगिंगला प्रतिबंध करण्यासाठी केलेल्या परिणामकारक उपाययोजनेची शासनाला तपासणी करता येईल आणि जर यामध्ये त्यांनी योग्य ती कार्यवाही केली नसेल तर राज्य शासनाकडून अनुदान नाकारण्यासारखी कारवाई केली जाऊ शकेल.

११) रॅगिंगला प्रतिबंध करण्यासाठी तत्संबंधीचा आशय असलेले बॅनर, बिल बोर्ड अथवा होर्डिंग्जस् आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर तसेच विद्यार्थी एकत्र येत असतात (उदा.ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह व इतर महत्त्वाच्या ठिकाणी) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करावेत.

१२) मा. सर्वोच्च न्यायालयाने सुचविलेल्या रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबतच्या वरील शिफारशी व विद्यापीठ अनुदान आयोग तसेच महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात प्रसिद्ध केलेल्या नियमांची अंमलबजावणी करणे सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था व शिक्षणसंस्थांना बंधनकारक असेल.

सदर अधिनियमाच्या पुस्तिकेची प्रत ही विद्यापीठ अनुदान आयोग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थी विकास मंडळाच्या (Students' Developement) लिंकमध्ये UGC Anti-Ragging Guideline Book ह्या स्वरूपात उपलब्ध आहे. ही सर्व माहिती महाविद्यालयाच्या माहितीपुस्तिकेमध्ये (prospectus) नमूद करणे आवश्यक असून या सर्व नियमांची अंमलबजावणी आपल्या स्तरावर काटेकोरपणे करणेसुद्धा बंधनकारक आहे.

वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर कार्यवाहीचा अहवाल सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये दर सहा महिन्यांनी (प्रथम व द्वितीय या दोन्ही सत्रांमध्ये) ऑनलाईन पद्धतीने (www. unipune.ac.in – BOD – BOD Online –Login– Main Menu Online Services – Students Developement–Menu-Anti-Ragging Report) येथे भरण्यात यावा. **ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेल्या अहवालाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरी असलेला अहवाल स्कॅन करून तिथेच अपलोड** करावा.

सदर प्रथम व द्वितीय सत्राचा अहवाल ऑनलाईन (Online) पद्धतीने भरणे अनिवार्य आहे. याची नोंद घ्यावी. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

ऑनलाईन अहवाल भरण्याबाबत तांत्रिक अडचणी/अधिक माहितीसाठी :
Email: **nssbsdsupport@pun.unipune.ac.in**

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 29 JUL 2026
आवक क्रमांक व्हीसी 4285
जावक दिनांक 29 JUL 2026

विद्यार्थी विकास मंडळ
आवक क्र. 242
29 JUL 2026
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Subject **Regarding Strict Implementation of UGC Anti-Ragging Regulations**

From Helpline <helpline@antiragging.in>

To pgimer-chd@nic.in <pgimer-chd@nic.in>, pkjain@nitp.ac.in <pkjain@nitp.ac.in>, director@nitp.ac.in <director@nitp.ac.in>, ponkvel@hotmail.com <ponkvel@hotmail.com>, pramodnaik678@gmail.com <pramodnaik678@gmail.com>, prasanna@iitdh.ac.in <prasanna@iitdh.ac.in>, premvrajput@gmail.com <premvrajput@gmail.com>, president.office@mygyanvihar.com <president.office@mygyanvihar.com>, president@bnuniversity.ac.in <president@bnuniversity.ac.in>, president@cept.ac.in <president@cept.ac.in>
357 more...

Date 28-07-2026 11:06 AM

- IMG_0001 (7).pdf (~493 KB)

Respected Madam/Sir,

Please find enclosed herewith an advisory issued by the Secretary, UGC regarding Anti-Ragging. You are requested to take appropriate action.

Best Regards,
Anti-Ragging Cell
University Grants Commission
New Delhi

PTO

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
प्रो. श्यामा रथ
सचिव
Prof. Shyama Rath
Secretary

सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

विश्वविद्यालय अनुदान आयोग
**University Grants Commission**
(शिक्षा मंत्रालय, भारत सरकार)
(Ministry of Education, Govt. of India)

F. No. 1-15/2009(ARC)PT.III

5 श्रावण, 2026/July 27, 2026

**Subject: Strict Implementation of UGC Regulations on Curbing the Menace of Ragging in Higher Educational Institutions**

आदरणीय महोदया/महोदय,

The University Grants Commission (UGC), in pursuance of the Hon'ble Supreme Court Judgment dated 08.05.2009 in Civil Appeal No. 887/2009, notified the **UGC Regulations on Curbing the Menace of Ragging in Higher Educational Institutions, 2009**. The Regulations are available at www.ugc.gov.in and www.antiragging.in.

All Higher Educational Institutions (HEIs) are advised to ensure strict compliance with the UGC Anti-Ragging Regulations and adopt effective measures to prevent, prohibit, and eliminate ragging in all its forms.

Institutions shall, inter alia, ensure:

- Constitution and effective functioning of anti-ragging bodies as prescribed under the Regulations.
- Display of 24x7 Toll Free Number. **1800-180-5522**, anti-ragging posters and publicity materials at prominent locations.
- Submission of anti-ragging undertakings by students and parents through www.antiragging.in.
- Conduct of awareness, counselling, orientation, and sensitization programmes.
- Vigilance in hostels and other vulnerable areas.
- Prompt redressal of complaints, protection of complainants, and timely reporting of cases.
- Immediate registration of FIRs and disciplinary action wherever a prima facie case of ragging is established.

All institutions are requested to accord the highest priority to anti-ragging measures, maintain zero tolerance towards ragging, and ensure compliance by affiliated colleges under their jurisdiction.

सादर,

भवदीया,
श्यामा रथ
(श्यामा रथ)

Vice-Chancellors/ Directors/ Principals of all HEI'S

बहादुरशाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-110002 | Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002
दूरभाष (Ph.): 011-23236288/23239337 | सम्पर्क सूत्र (ई-मेल) (E-mail) : secy.ugc@nic.in